| MHAU100007802025 | दिवाणी किरकोळ अर्ज/**138/2025**<br><br>**कविता गणेश नलावडे वि.. निल** |
|---|---|

## निशाणी क्र.१ खालील आदेश

०१. अर्जदारांचे नावे वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

०२. अर्जदार यांनी अर्जामध्ये नमुद केले आहे की, मयत गणेश कारभारी नलावडे यांचे दिनांक **१४/०५/२०२५** रोजी निधन झाले आहे. मयत गणेश कारभारी नलावडे हे अर्जदार क्र. १ चे पती, अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडील व अर्जदार क्र. ४ यांचा मुलगा आहे. तसेच मयत गणेश कारभारी नलावडे यांचे आई ही फार वर्षापूर्वी मयत झालेली असल्यामुळे ती मयत झाल्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा अर्जदारांकडे उपलब्ध नाही. तसेच अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असल्याचे नमुद केले आहे. अर्जदारांनी पुढे असे कथन केले की, अर्जदारांव्यतिरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाही.

०३. अर्जदारांनी असे कथन केले की, ते मयत गणेश कारभारी नलावडे यांचे नावाने बजाज कंपनीची प्लॅटीना दुचाकी वाहन ज्याचा नोंदणीकृत क्र. एमएच-२०/ एफई-७७५६ असा आहे. सदर वाहन अर्जदार क्र. १ च्या नावे करण्यासाठी अर्जदार क्र. २ ते ४ यांची कोणतीही हरकत नाही. तसेच अर्जदार हे मयताचे कायदेशिर वारस असल्याने अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामांसाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता अर्जदारांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

०४. अर्जदारांनी अर्जातील कथनाच्या सत्यतेसाठी अर्जदार क्र.०१ यांनी साक्षीपुराव्याचे शपथपत्र नि.क्र.(नि.क्र.१०)वर अभिलेखावर दाखल केले असुन त्यांनी सदर शपथपत्रात अर्जातील कथनांचा पुर्नउल्लेख केला आहे. तसेच अर्जदारांनी त्यांच्या आधारकार्डांच्या प्रती अभिलेखावर दाखल केल्या आहेत. मयत गणेश कारभारी नलावडे यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची प्रत, दुचाकी वाहनाचे आर.सी.बुकची प्रत, इ. दस्त कागदपत्रांच्या यादीसोबत सोबत (नि.क्र.०४) अभिलेखावर दाखल केले आहेत. त्याचप्रमाणे अर्जदार यांनी न्यायालयामार्फत मराठी वृत्तपत्र "सामना” मध्ये दि. २० डिसेंबर २०२५ रोजीच्या अंकात जाहीर प्रगटन (नि.क्र.०९) प्रसिध्द करण्यात आले, मात्र मुदतीत कोणीही आक्षेप

नोंदविलेला नाही. अर्जदार यांनी शपथेवर मयतांना अर्जदारांव्यतिरिक्त इतर कोणीही वारस नसल्याचे नमुद केले आहे. अर्जदारांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्याची मागणी केली आहे, अर्जदार यांनी अर्जातील कथनांचा पुनर्उल्लेख केल्याप्रमाणे अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) मिळण्यासाठी अन्य कुणीही आक्षेप घेतला नाही.

**०५.** वरील पुरावा व कागदपत्रांच्या आधारे सर्व अर्जदार हे मयत गणेश कारभारी नलावडे यांचे मृत्यु पश्चात त्यांचे वारसदार आहेत असे दिसते. त्यांच्या पुराव्याची विश्वासार्हता बाधित होईल याचे कोणतेही कारण समोर आलेले नाही. अशा परिस्थितीत, अर्जदार यांनी मागणी केल्याप्रमाणे ते मयत गणेश कारभारी नलावडे यांचे वारस असल्याचे दिसुन येत असल्याने ते वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र असुन त्यांच्या नावे वारस प्रमाणपत्र देणे न्यायोचीत होईल, म्हणुन मी खालील प्रमाणे आदेश करतो.

**<u>आदेश</u>**

i. अर्जदारांचा अर्ज मंजुर करण्यात येतो.
ii. अर्जदार हे मयत गणेश कारभारी नलावडे यांचे वारस असल्याबाबत त्यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र आवश्यक ते न्यायालयीन मुद्रांक / शुल्क भरल्यानंतर देण्यात यावे.
iii. अर्जदारांनी अर्जाचा खर्च सोसावा.
iv. अर्ज निकाली काढण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by GANESH DATTA GURNULE
Date: 2026.04.04 18:07:38 +0530

**( जी. डी. गुरनूले )**

**दिनांकः ०४/०४/२०२६.** **सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,**

**खुलताबाद.**

<u>**CERTIFICATE**</u>

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order/judgment/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | N.D.Narwade |
| Court | : | Jt. Civil Judge, J. D. and J.M.F.C., Khultabad. |
| Date | : | 04.04.2026. |
| Order signed by the presiding officer on | : | 04.04.2026. |
| Order uploaded on | : | 04.04.2026.. |